# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**आयोगाने विज्ञापित केलेल्या पदांसाठी / परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकृतीची व्यवस्था आता www.mahaonline.gov.in या वेबसाईटवर करण्यात आली आहे. यास्तव अर्ज करण्याकरिता उमेदवारांनी सदर वेबसाईटवर नव्याने नोंदणी करणे आवश्यक असून, त्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत :-**

## ऑनलाईन अर्ज प्रणालीबाबत सूचना

### पहिल्या वेळी प्रोफाईल आणि अर्ज भरण्यासाठीच्या सूचना

### अर्जदाराच्या प्रोफाईलची पहिल्या वेळी नोंद करण्यासाठीच्या सूचना

१ वेब ब्राऊजरवर https://www.mahaonline.gov.in टाईप करा.

२. "एमपीएससी" दुव्यासह "ताज्या घडामोडी" नावाचा रकाना दिसेल.

३ "एमपीएससी" दुव्यावर क्लिक करताच "एमपीएससी जाहिरात" हे मुख्य पृष्ठ प्रदर्शित होईल.

**पहिल्या वेळीचा वापरकर्ता**

अ. या सेवेचा पहिल्या वेळी वापर करणा-या वापरकर्त्याला प्रोफाईलमध्ये माहितीची नोंद करण्यापूर्वी नोंदणी करावी लागेल. त्यासाठी वापरकर्त्याने "माहिती दाखल करण्याकरता येथे क्लिक करा" वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा "लॉग इन" पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते ( वापरकर्त्याचे नाव आणि पासवर्ड) निर्माण करण्यासाठी, या सेवेचा पहिल्या वेळी वापर करणा-या वापरकर्त्याला "Register" या पर्यायावर क्लिक करावे लागेल.

ब. वापरकर्त्याचे नाव आणि पासवर्डसह यशस्वीरित्या लॉग इन केल्यानंतर यंत्रणा "नोंदणी अर्ज" हा अर्ज प्रदर्शित करेल.

**सर्वसाधारण वापरकर्ता**

अ प्रोफाईलमध्ये माहितीची नोंद करण्यासाठी अथवा ती अद्ययावत करण्यासाठी वापरकर्ता "प्रथम वेळेस दाखल करावयाची अर्जदाराची माहिती" समोरील "माहिती दाखल करण्याकरता येथे क्लिक करा" या पर्यायावर क्लिक करेल. यंत्रणा वापरकर्त्याचे नाव आणि पासवर्डची विचारणा करेल.

ब यशस्वीरित्या लॉग इन केल्यानंतर यंत्रणा "नोंदणी अर्ज" हा अर्ज प्रदर्शित करेल.

४. वापरकर्ता "नोंदणी अर्ज" या अर्जामध्ये सर्व तपशिलांची नोंद करेल आणि "Submit" बटनावर क्लिक करेल. माहिती यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर यंत्रणा "आपल्या प्रोफाईलची माहिती यशस्वीरित्या जतन झाली" असा संदेश प्रदर्शित करेल.

५. जेव्हा वापरकर्ता एखाद्या जाहिरातीसाठी अर्ज करेल, तेव्हा अर्जात लागू असेल तेथे ही माहिती आपोआप प्रदर्शित होईल.

### पदासाठी अर्ज करण्यासाठीच्या सूचना

१ वेब ब्राऊजरवर https://www.mahaonline.gov.in टाईप करा.

२. "एमपीएससी" दुव्यासह "ताज्या घडामोडी" नावाचा रकाना दिसेल.

३ "एमपीएससी" दुव्यावर क्लिक करताच "एमपीएससी जाहिरात" हे मुख्य पृष्ठ प्रदर्शित होईल.

**पहिल्या वेळीचा वापरकर्ता**

अ. या सेवेचा पहिल्या वेळी वापर करणा-या वापरकर्त्याला प्रोफाईलमध्ये माहितीची नोंद करण्यापूर्वी नोंदणी करावी लागेल. त्यासाठी वापरकर्त्याने "माहिती दाखल करण्याकरता येथे क्लिक करा" वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा "लॉग इन" पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते ( वापरकर्त्याचे नाव आणि पासवर्ड) निर्माण करण्यासाठी, या सेवेचा पहिल्या वेळी वापर करणाऱ्या वापरकर्त्याला "Register" या पर्यायावर क्लिक करावे लागेल.

ब] वापरकर्त्याला पहिल्या भागात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल. (अर्जदाराच्या प्रोफाईलची पहिल्या वेळी नोंद करण्यासाठीच्या सूचना)

**सर्वसाधारण वापरकर्ता**

अ] सर्वसाधारण वापरकर्ता जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या पर्यायावर थेट क्लिक करेल. यंत्रणा वापरकर्त्याचे नाव आणि पासवर्डची विचारणा करेल.

ब] यशस्वीरित्या लॉग इन झाल्यानंतर यंत्रणा वैधता तपासेल, वापरकर्ता निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज भरता येईल.

क] जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास “माहिती संग्रहित होऊ शकत नाही” असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. वापरकर्ता अर्जात सर्व तपशिलांची नोंद करेल आणि “Submit” वर क्लिक करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर “तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला” असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

४. “रक्कम भरा” या पर्यायावर क्लिक करून अर्जदाराला क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिंग (३५+ बँका) द्वारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करून संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र) येथे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारू शकेल.

५. https://www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

६. नोंदणी प्रक्रियेमध्ये येणा-या अडचणींचे निराकरण करण्याकरिता 022-67077076,022-67077077,022-67077081, 022-67077082 या हेल्पलाईनशी संपर्क साधावा.

**दिनांक : १४ जून, २०१३** **सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**